



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ४४, शुक्रवार ३ जानेवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## पारनेरच्या पाणी योजनेला फेब्रुवारी मध्येच मंजुरी!

■ मुख्यमंत्र्यांच्या सहीनंतर योजनेचा मार्ग मोकळा ■ पाणी योजनेत राजकारण आणणार नाही ■ आमदार काशिनाथ दाते यांचे स्पष्टीकरण

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहराची ७३ लाख रूपयांच्या पाणी योजनेचा पारनेर नगरपंचायतीने प्रस्ताव पाठविल्यानंतर राज्यस्तरीय तांत्रीक समितीने त्यास फेब्रवारी २०२४ मध्येच मंजुरी दिली आहे. आता त्या प्रस्तावावर केवळ मुख्यमंत्रयांची सही झाल्यावर या योजनेचा मार्ग मोकळा होणार आहे. पारनेर नगरपंचायतीची सत्ता कोणाकडेही असली तरी आपण या कामात राजकारण आणणार नाही अशी निःसंदीग्ध ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी पारनेरात बोलताना दिली.**

विधानसभा निवडणूकीमध्ये पारनेर-नगर मतदारसंघात विजय संपादन केल्याबद्दल किसान युनियन परिवाराच्या वतीने दाते यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला त्यावेळी दाते यांनी पारनेर शहराच्या पाणी योजनेवर भाष्य केले.
दाते म्हणाले, पारनेर शहराची पाणी योजना मार्गी लागणे महत्वाचे आहे. त्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेउन या प्रस्तावावर सही करण्यासंदर्भात विनंती करणार आहोत. या योजनेमध्ये अजितबात राजकारण आणायचे नाही असे त्यांनी निःसंदीग्धपणे सांगितले.

पारनेर नगरपंचायतीमध्ये खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन झाल्यानंतर लंके यांनी पहिल्याच दिवशी शहरासाठी शास्वत पाणी योजना राबविण्याची ग्वाही दिली होती. या योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी नगरपंचायत पदाधिकाऱ्यांना सांगण्यात आल्यानंतर ही जबाबदारी पाणी पुरवठा समितीचे सभापती योगेश मते यांच्यावर सोपविण्यात आली होती. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही या योजनेसाठी निधी देण्याची ग्वाही पिंपळनेर दौऱ्यादरम्यान दिली होती.

या योजनेच्या पंप हाउससाठी ढवळपुरी येथे थोरात परिवार तसेच कुंभारवाडी औटी परिवार व बुगेवाडी येथे कावरे परिवाराची जलकुंभासाठी खाजगी जागा नगरपंचायतच्या नावे बक्षिसपत्र करून देण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे नगरपंचायतीच्या खर्चात मोठी बचत झाली.




■ किसान शैक्षणिक संकुलात आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### राजकारण आडवे आले, पारनेर वगळले !

राज्य स्तरीय तांत्रीक समितीने राज्यातील ५२ नगरपंचायत, नगरपालीका व महानगरपालीका यांच्या पाणी योजनांसह विविध योजनांना तांत्रीक मंजुरीची शिफारस केली होती. त्यानंतर १३ ते १६ मार्च दरम्यान पारनेर वगळता उर्वरीत सर्व प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. १३ ते १६ मार्च रोजी विविध योजनांना मंजुरी देण्यात आली, त्यापूव दोन दिवस आगोदर खा. नीलेश लंके यांनी त्यांच्या मी अनुभवलेला कोविड या पुस्तकाचे खा. शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले होते हा योगायोग म्हणावा लागेल

### पाणी योजनेचा प्रवास

राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुतीचे सरकार आल्यानंतर या प्रस्तावाचा प्रवास संथ झाला. त्यात अनेक त्रृटी काढण्यात आल्या. ७ मार्च २०२२ रोजी ३४, २१ नोव्हेंबर २०२२ रोजी २८ त्रृटी काढण्यात आल्या, त्या नगरपंचायत पदाधिकाऱ्यांनी दुर करून दिल्या. त्यानंतर १ जुन २०२३ रोजी खा. नीलेश लंके यांनी नाशिक येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक विभागीय कार्यालयात जाऊन तांत्रीक मंजुरीसाठी १ टक्का शुल्क भरण्याचे पत्र घेतले. दि.२ जून २०२२ रोजी नगरपंचायतीने १ टक्के शुल्क म्हणून ७२ लाख ८७ हजार २७७ रूपये धनादेशाद्वारे जमा केले. ६ जुन रोजी २०२३ रोजी योजनेस तांत्रीक मंजुरी देण्यात आली. योजनेत सोलरचा समावेश करण्यात आल्यानंतर दि.२० जुलै २०२३ रोजी सुधारीत तांत्रीक मंजुरी देण्यात आली.

### तांत्रीक मंजुरीनंतर पुन्हा त्रृटी !

जीवन प्राधिकरणाकडून तांत्रीक मंजुरी दिल्यानंतर दि.३ ऑगस्ट २३ रोजी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून चार त्रृटी काढण्यात आल्या. गोदावरी खोरे तुटीचे असताना मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या कृष्णा खोऱ्यातील पाणी योजनेसाठी पाणी कशासाठी असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. पारनेर हे कृष्णा आणि गोदावरी खो-यात असल्याने ही त्रृटी दुर करण्यात येउन आवष्यक कागदपत्रांची पुर्तता करून ९ फेब्रुवारी २४ रोजी पाणी हक्क मंजुर होऊन तांत्रीक समितीने मंजुरी दिली.

### रोखलेला निधीही देऊ !

तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे यांनी भाजपा समर्थक नगरसेवकांना निधी मंजूर करून दिला होता. मात्र लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या नाराजीतून हा निधी रोखला गेला. हा निधीही नगरसेवकांना आपण देऊ अशी ग्वाही आ. दाते यांनी यावेळी बोलताना दिली.

## तीन लाख भाविक शनिचरणी लिन

नतमस्तक होऊन केला नववर्षास प्रारंभ | एक लाख भाविक वाढले

शनिशिंगणापूर : प्रतिनिधी

**नव वर्षदिनी बुधवारी शनिशिंगणापूरला तीन लाख भाविक शनिचरणी लीन झाले. शिर्डी मुक्कामी भाविकांची संख्या वाढल्याने या नववर्षदिनी एक लाख भाविक शिंगणापूरला वाढले.**



गेल्या आठवडाभरापासून शिंगणापूरला नाताळ सुट्ट्या, शनिवार, नववर्ष पूर्व संध्या व नववर्ष यामुळे यंदा भाविकांची संख्या वाढली. नववर्षाची सुरुवात भाविकांनी शनिदेवा चरणी लीन होऊन केली आहे. नववर्ष स्वागतासाठी देवस्थान सह शिंगणापूरला सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आहे. मंगळवारी मध्यरात्री बारा वाजेपासून, तर बुधवारी रात्रीपर्यंत भाविकांनी शिंगणापूर फुलून गेले आहे. दिवसभर दर्शनासाठी झुंबड दिसली.


यंदा परदेशी भाविकांची तसेच आंध्र, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, गुजरात, दिल्ली, पंजाब, राजस्थान या राज्यातील भाविकांची संख्या वाढलेली दिसली. चौथऱ्यावरील सशुल्क दर्शन घेण्यासाठी, तेल विक्री, बर्फी प्रसाद विक्री या काऊंटरलाही भाविकांची दिवसभर गर्दी होती. चौथरा दर्शन घेणाऱ्या भाविकातही यावेळी दुपटीने वाढ झाली. मंदिर प्रवेशद्वारात भाविकांची वाहने आली की भाविक वाहनातून उतरून थेट मंदिर प्रवेशद्वारातून भुयारी दर्शन रांगेतून चौथऱ्याजवळ जात अवघ्या पंधरा मिनिटात बाहेर पडत आहेत. आगळे वेगळे असलेले हे देवस्थान दर्शनासाठीही आगळंवेगळं ठरत आहे.

## वीजदरवाढीची टांगती तलवार!

■ प्रतियुनिट ४० पैसे वाढण्याची भीती
■ केंद्र सरकारकडून मार्ग काढण्याचा प्रयत्न

मुंबई :प्रतिनिधी

**देशभरातील औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये 'डीसल्फरायझेशन' युनिट बसविण्याची सक्ती यावर्षी अंमलात आणण्याचे निर्देश केंद्रीय पर्यावरण खात्याने दिल्याने प्रति युनिट ३५-४० पैसे वीज दरवाढीची भीती आहे. त्यामुळे या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी केंद्रीय ऊर्जा विभागाने अन्य पर्याय अजमावण्यासाठी पुढील आठवड्यात नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक बोलाविली आहे. राज्य सरकारने केंद्राकडे या सक्तीतून सुटका करण्यासाठी पाठपुरावा न केल्यास राज्यातील औष्णिक वीजप्रकल्पांसाठीही ही युनिट बसवावी लागणार आहेत.**



औष्णिक वीज प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. त्याला आळा घालण्यासाठी व विशेषत: सल्फर डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यासाठी 'डीसल्फरायझेशन' युनिट बसविण्याच्या सूचना २०१९ पासून वीज प्रकल्पांना देण्यात आल्या होत्या. केंद्रीय ऊर्जा खात्याने आयआयटी (दिल्ली) कडून याबाबत अभ्यास अहवालही मागविला होता. आयआयटीने दोन वर्षांपूर्वी अहवाल दिला. औष्णिक वीज प्रकल्पापासून ३० किमी परिसरात सल्फरडाय ऑक्साईडचे प्रमाण खूप वाढलेले असते, तर ६० किमीच्या पुढील परिसरात मात्र हे प्रदूषण रहात नाही, असे अहवालात नमूद करण्यात आले होते. त्यामुळे ज्या प्रकल्पांपासून ३० किमीच्या क्षेत्रात शहरे किंवा मोठी गावे आहेत, त्या प्रकल्पांसाठी 'डीसल्फरायझेशन' युनिट बसविण्याची सक्ती करणे आवश्यक असल्याचे दिसून आले होते.

हे युनिट बसविण्यासाठी प्रति मेगावॉट सुमारे एक कोटी रुपये खर्च येतो. राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाची (एनटीपीसी) स्थापित क्षमता सुमारे ६० हजार मेगावॉट असून राज्याला सुमारे सहा हजार मेगावॉट वीज दिली जाते. एनटीपीसीने सुमारे सहा हजार मेगावॉट क्षमतेच्या प्रकल्पांमध्ये हे युनिट बसविले असून त्यापैकी राज्याला दोन-तीन हजार मेगावॉट वीज मिळते. हे युनिट बसविण्यासाठीचा खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यासाठी केंद्रीय वीज प्राधिकरणाने एनटीपीसीला परवानगीही दिली आहे.

महानिर्मिती कंपनी सुमारे सहा-सात हजार मेगावॉट उर्वरीत पान ३ वर

## देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी अजित पवारांच्या ताफ्यात?

खासदार बजरंग सोनवणे यांचा आरोप

बीड : प्रतिनिधी

**संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एक आरोपी हा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार मस्साजोग गावात आले होते तेव्हा त्यांच्या गाड्यांच्या ताफ्यातील एका गाडीत होता. बजरंग सोनवणे यांच्या या वक्तव्याचा रोख वाल्मिक कराड यांच्या दिशेने असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता संतोष देशमुख हत्याप्रकरणातील धागेदोरे हे धनंजय मुंडे यांच्या पाठोपाठ अजित पवार यांच्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बजरंग सोनावणे यांनी गुरुवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना यासंदर्भात भाष्य केलं.**



**नेमकं काय म्हणाले बजरंग सोनवणे?**

"अजित पवार जेव्हा मस्साजोगला आले तेव्हा त्यांच्या ताफ्यात जी गाडी होती, त्याच गाडीतून एक आरोपी पोलिस स्टेशनला पोहोचला. पुण्यात आरोपी ज्या घरात थांबला त्याचा तपास व्हायला पाहिजे, अशी मागणीही बजरंग सोनवणे यांनी केली. या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. जो आरोपी शरण आला आहे त्याचा तपास सीआयडीने करावा. तीन गुन्ह्यांचा तपास एकत्र केल्याने निश्चितच काहीतरी समोर येईल. तपासातून 'दूध का दूध, पानी का पानी' होईल. संतोष देशमुख आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देणे, ही आमची जबाबदारी आहे, असंही बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

**संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या**

बीडच्या मस्साजोग या गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे उर्वरीत पान ३ वर

## पार्थिव घरी आणताना मृत बाबा चक्क उठून बसले!

रुग्णवाहिकेचे चाक खड्ड्यात आदळले अन् झाला चमत्कार

कोल्हापूर : प्रतिनिधी

**कोल्हापुरात डॉक्टरांनी मृत घोषित केलेल्या एका वृद्ध व्यक्तीला खड्ड्यांमुळे जीवनदान मिळाल्याची अजब घटना समोर आली आहे. कसबा बावडा येथील पांडुरंग उलपे असे या वृद्ध व्यक्तीचे नाव असून सोमवारी रात्री अखंड हरिनामाचा गजर करत असताना अचानक बसल्या जागी त्यांना दरदरून घाम आला, मुखात पंढरीच्या विठुरायाचं नामस्मरण करत असतानाच पांडुरंग उलपे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. कुटुंबीयांनी तत्काळ एका खासगी रुग्णालयात दाखल केल. मात्र प्रकृती खालावल्याने डॉक्टरांनी सोमवारी रात्री उशिरा त्यांना मृत घोषित केले. मृतदेह घरी घेऊन येताना रुग्णवाहिका खड्ड्यात आदळली आणि चमत्कार झाला आणि पांडुरंग उलपे यांची हालचाल झाली.**



कोल्हापुरातील कसबा बावडा येथे राहणारे ६५ वर्षीय पांडुरंग रामा उलपे पत्नी बाळाबाई यांच्यासोबत राहतात. घरात वारकरी सांप्रदाय वातावरण असल्याने ते सोमवारी घरीच अखंड हरिनामाचा जप करत होते. रात्रीच्या सुमारास त्यांना अचानक त्यांना अस्वस्थ वाटू लागले अंगाला दरदडून घामाला आणि काही क्षणातच पांडुरंग उलपे बसल्या ठिकाणी कोसळले, यानंतर शेजाऱ्यांच्या मदतीने उलपे यांना गंगावेश येथील खासगी रुग्णालयात त्यांना दाखल केलं मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक होती.

उपचार सुरू असतानाच सोमवारी रात्री साडे अकराच्या दरम्यान पांडुरंग उलपे यांची प्रकृती खालावली आणि डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केल. उर्वरीत पान ३ वर










# युवा

## घटस्फोटानंतर मागे वळून पाहताना....

**कोणत्याही व्यक्तीशी नातं जपताना दोन्ही बाजूंनी असावं लागतं. तसंच जेव्हा एखाद्याचा घटस्फोट होतो तेव्हा दोन्ही व्यक्तींना दोष द्यावा अथवा त्यांच्यातील बाबींविषयी चर्चा न करता नक्की काय कारण असू शकते याचा विचार करावा. ज्या व्यक्ती घटस्फोटाच्या या प्रक्रियेतून जातात त्यांच्यासाठी तो आनंदाचा क्षण नसतो. त्यामागे अनेक सहन केलेल्या गोष्टी आणि कडू आठवणीही असतात**



### जेव्हा त्यांची आठवण येईल

आपल्या जोडीदारापासून वेगळं झाल्यानंतर अनेकदा एकटेपणा नकोसा वाटतो आणि आठवणीने अथवा ओढीने बेचैन व्हायला होतं. अशा परिस्थितीत स्वतःवर नियंत्रण मिळवता यायला हवे आणि यादरम्यान कधीही कोणाशी विचार न करता मैत्री करू नका. तुमच्या एकटेपणाचा फायदा यामुळे कोणीही उचलू शकतं. त्यामुळे या गोष्टीची काळजी घ्या आणि स्वतःला वेळ द्या. दुसऱ्या नात्यासाठी लगेच उत्सुकता दाखवू नका.

### आयुष्य मजेत जगा

आपल्याकडे जोडीदार नाही याची खंत बाळगण्यापेक्षा अथवा आपल्या एक्सबरोबर आता कोणीतरी नवं आहे आणि आपण एकटेच आहोत या सर्वांचा विचार करण्यापेक्षा आयुष्य नव्याने जगण्याचा प्रयत्न करा. स्वतःला मित्रमैत्रिणींसह आणि कामात व्यस्त ठेवा. आपल्या मनाचे दरवाजे नव्या नात्यासाठी खुले करा. मात्र त्वरीत एखाद्याकडे आकर्षित होऊ नका.

### विश्वास ठेवणे गरजेचे

नातं तुटल्यानंतर नवं नातं सुरू करणं अजिबात सोपं नाही. कडवट आठवणी आणि अनुभव यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे नातं का तुटलं? कोणती कमतरता राहिली याचा विचार करून भविष्यात नातं जोडताना चुकीच्या व्यक्तीची निवड टाळा. तसंच एखाद्यावर विश्वास ठेवणे चुकीचे नाही हे लक्षात घ्या. पूर्ण विश्वासाने नवं आयुष्य सुरू करा. तुम्ही पुन्हा प्रेमात पडणं अजिबात चुकीचे नाही.

### कॉमन फ्रेंड्सचा सामना

लग्न तुटल्यानंतर इतर नाती तुटत नाहीत. विशेषतः कॉमन फ्रेंड्स. कधीही मनात ही गुंतागुंत निर्माण करू नका. घटस्फोट अथवा दूर होणं हा तुमचा वैयक्तिक निर्णय आहे आणि त्याचा मैत्रीवर कधीही परिणाम होऊ देऊ नका. हेच मित्रमैत्रिणी तुम्हाला तुमच्या पडत्या काळात भक्कम साथ देतात आणि याशिवाय नात्यात पुढे जाण्यासाठी विश्वासही देतात.


### कोणावरही ओझं न होणं

अशा परिस्थितीत आई-वडिलांना अथवा कुटुंबियांना दुःख होणं साहजिक आहे. मात्र आपल्या आई- वडिलांवर अथवा भाऊ- वहिनी असतील तर त्यांच्यावर ओझं न होता परिस्थिती सांभाळण्याचा प्रयत्न करा. तुम्ही स्वतंत्र राहून बरंच काही करू शकता. केवळ एक चुकीच्या नात्यामुळे सर्व काही बिघडत नाही हा विश्वास कुटुंबियांना द्या आणि स्वतःलाही त्यातून बाहेर पडण्यासाठी वेळ द्या.

### फायनान्शियल मॅनेजमेंट

नातं तुटलं म्हणजे सर्व संपलं असं होत नाही. तुम्ही जर काम करत असाल तर जोडीदारापासून वेगळं झाल्यानंतर तुम्हाला आर्थिक त्रासाचा तितका सामना करावा लागणार नाही. मात्र तरीही एकट्याने घर सांभाळताना जर तारेवरची कसरत होत असेल तर व्यवस्थित मॅनेजमेंट शिकून घ्या. मूल असल्यास, त्याची जबाबदारी आत्मविश्वासाने हाताळा.





## साखरपुडा होऊनही का तुटते अनेकांचे लग्न?

**कोणीतरी म्हटले आहे की लग्न हे एक असे बंधन आहे जे केवळ दोन व्यक्तींनाच नाही तर दोन कुटुंबांना घट्ट नात्यात बांधते. त्यामुळे जोडप्याने ते आयुष्यभर जपावे अशी अपेक्षा असते. त्यांचे वैवाहिक जीवन देखील आनंदाने भरलेले असावे, अशी प्रार्थना दोन्ही कुटुंब करत असतात. मात्र कधी कधी असे होत नाही. कधी कधी हा प्रवास सुरू होण्यापूर्वीच संपतो. शेवटच्या क्षणी लग्न मोडते. हा एक असा अनुभव आहे जो केवळ वधू आणि वरांना पूर्णपणे उद्ध्वस्त करत नाही तर त्यांच्या कुटुंबांसाठी देखील अत्यंत वेदनादायक असतो. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, सर्व काही सुरळीत असतानाही शेवटच्या क्षणी लग्न का तुटते?**

### व्यक्तिमत्वातील फरक

लग्नापूर्वी एकमेकांना जाणून घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हा मुलगा आणि मुलगी केवळ फोनवरच बोलत नाहीत तर एकमेकांना भेटण्याचाही प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत जेव्हा जोडप्यांमध्ये लहानसहान मुद्द्यांपासून ते आयुष्यातील मोठ्या निर्णयापर्यंत मोठे मतभेद होतात तेव्हा ते लग्न मोडण्याचा निर्णय घेतात.

### भूतकाळाचा प्रभाव

भूतकाळातील नात्याचा प्रभाव अनेकदा नवीन नात्यावर परिणाम करतो यात शंका नाही. अशा परिस्थितीत, जर एखाद्या व्यक्तीचे पूर्वी एखाद्यावर प्रेम होते, तर त्याला नवीन नातेसंबंध जोडणे कठीण होते. त्याला अनेकदा प्रश्न पडतो की तो योग्य करत आहे का? त्याच वेळी, लग्नाच्या विधी दरम्यान त्याचे जुने प्रेम परत आले तरीही लग्न तुटते. यामुळे मात्र कुटुंबाला आयुष्यभर अपमान सहन करावा लागतो.



### आर्थिक समस्या

मुलीला फक्त दोन कपडे घालून निरोप दिला की झाले, हा काळ आता खूप मागे गेला आहे. आज लग्न हे एक महागडा सोहळा होऊन बसले आहे. जर तुम्हाला तुमच्या मुलीसाठी योग्य घर शोधायचे असेल तर तुम्हाला आर्थिकदृष्ट्याही मजबूत असणे आवश्यक आहे. पण अनेक वेळा असे होत नाही. सासरच्या लोकांच्या इच्छा पूर्ण करताना वडील कर्जबाजारी होतात, ज्यामुळे या सुंदर नातेसंबंधाला खीळ बसते, ज्यामुळे ते लग्न पुढे ढकलण्याचा किंवा त्यातून पूर्णपणे माघार घेण्याचा निर्णय ते घेतात.

### आरोग्याशी संबंधित समस्या

अनेक वेळा कुटुंबातील सदस्य आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या आरोग्यासंबंधीच्या समस्यांबद्दल सांगत नाहीत, जे नंतर लग्न मोडण्याचे कारण बनते. लग्नानंतर ही गोष्ट कळली तर बरे होईल, असे त्यांना वाटते. मात्र, असे होत नाही. कोणाला काही गंभीर आजार असल्यास त्याची चर्चा लग्नाआधी करावी. कारण लग्न होईपर्यंत सत्य लपवणे कठीण होते.

## जास्त थट्टा-मस्करी केल्यानेही संबंध होऊ शकतात खराब

**बऱ्याच लोकांचा असा विश्वास आहे की नात्यात जितका विनोदी स्वभाव असेल तितके तुमच्या दोघांमध्ये प्रेम वाढेल. मात्र, असे होत नाही. नात्यात जास्त थट्टा, मस्करी करणेही कधी कधी अंगलट येऊ शकते. नातेसंबंध खराब होऊ शकतात...**

बऱ्याच जोडप्यांचा असा विश्वास आहे की जर त्यांच्या नात्यात हास्यविनोद असेल तर त्यांच्यात सर्व काही चांगले चालले आहे. त्यांचे बाँडिंगही मजबूत आहे. इतकंच नाही तर काही लोक असंही म्हणतात की, नात्याचा टोन जितका विनोदी असेल तितके प्रेम तर वाढेलच पण भांडणाचा धोकाही कमी होईल. पण नात्यातल्या विनोदामुळे कधी कधी नातं मजबूत होण्याऐवजी जोडपी विभक्त होऊ शकतात. हास्यविनोद काही प्रमाणात ठीक आहे, परंतु काही काळानंतर ही वृत्ती चांगली दिसत नाही. याचे कारण असे की लोक एकमेकांना विनोदी पद्धतीने टोमणे मारायला लागतात. ज्यानंतर कपल्समध्ये फक्त रागच निर्माण होत नाही तर कधी कधी गोष्टी इतक्या बिघडतात की ते एकमेकांसोबत राहण्यासही तयार नसतात.

- आधी गंमतीचा अर्थ समजून घ्या : जोडीदारांमधील विनोदाचा अभाव हे त्यांच्या विभक्त होण्याचे कारण बनते. अशा वेळी नात्यात विनोद असणं गरजेचं आहे, पण मर्यादित प्रमाणात. खरंतर एखाद्याचा चेष्टेने अपमान करणे किंवा कोणाच्या असहायतेवर हसणे योग्य नाही. कोणीतरी बरोबरच म्हटले आहे की विनोद असा असावा की बोलणारा आणि ऐकणारा दोघेही हसतील. तुमचे म्हणणे ऐकून समोरच्याला खूप राग येईल असे होऊ नये. कारण नात्यात अशी परिस्थिती निर्माण झाली तर तुम्हा दोघांमध्ये सर्व काही बिघडेल. तुमचा विनोद तुमच्या जोडीदाराच्या हृदयापर्यंत पोहोचेल.
- वैयक्तिक समस्या गंमत नाही : कधी कधी गंमतीने आपण अशा गोष्टी बोलतो. ज्यामुळे समोरच्याला वाईट वाटू शकते. विशेषतः जेव्हा विनोद एखाद्याच्या कमकुवतपणावर किंवा असुरक्षिततेवर केला जातो तेव्हा तो खूप दुखावतो. जर एखादी व्यक्ती सतत विनोदाचा भाग बनत असेल तर त्याला असे वाटते की आपण त्याच्या भावनांची काळजी घेत नाही. त्यामुळे त्यांच्यातील विश्वास कमी होतो.



- हसणे आणि विनोद कसे संतुलित करावे? : प्रत्येक व्यक्तीची विनोदबुद्धी वेगळी असते. एखाद्याला जे मजेदार वाटते ते दुसऱ्याला वाईट वाटू शकते. अशा परिस्थितीत, विनोद करताना, आपले शब्द समोरच्या व्यक्तीला कसे लागतील हे लक्षात ठेवा. जर कोणी तुमच्या विनोदावर रागावला असेल तर त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करा. एवढेच नाही तर अनवधानाने कोणाचे मन दुखावले असेल तर माफी मागायला अजिबात संकोच करू नका. यामुळे तुमचे नाते बिघडणार नाही.

## काय आहे DADT ट्रेंड?

### जो आवडतोय प्रत्येक जोडप्याला...

**रिलेशनशिप आणि डेटिंगच्या जगात दररोज एक नवीन शब्द ऐकू येतो. आजकाल, DADT ट्रेंडची खूप चर्चा होत आहे आणि जोडप्यांनादेखील तो आवडत आहे. तथापि, त्याचा अर्थ जाणून घेतल्यावर, आपल्याला त्याचे अनुसरण करावे लागेल. कारण सध्याच्या काळात ते अगदी बरोबरच आहे...**




आजकाल नातेसंबंध विश्वासापेक्षा ट्रेंडवर आधारित असतात. रोज कोणत्या ना कोणत्या नवीन ट्रेंडची चर्चा होते. आजकाल DADT म्हणजेच Don't Ask, Don't Tell (विचारू नका, सांगू नका) यावर चर्चा होत आहे. आता पाहूया की ते नातेसंबंधात काय भूमिका बजावते वास्तविक प्रत्येकाला DADT चे अनुसरण करायचे आहे, कारण ते तडजोड आणि गोपनीयतेशी संबंधित आहे. ज्याची आजच्या काळात सर्वाधिक गरज आहे. म्हणूनच आधुनिक युगातील जोडप्यांना हा ट्रेंड खूप आवडतो. आता यात काय चांगले आहे, आम्ही तुम्हाला त्याबद्दल सर्व काही सांगणार आहोत. जे तुम्हालाही आवडेल. DADT ला सोप्या शब्दात एक प्रकारचा करार देखील म्हणता येईल. याचा अर्थ नात्यात काही गोष्टी अशा असतात ज्याबद्दल तुम्हाला बोलायचे नसते. प्रायव्हसी जपताना तुमच्या पार्टनरवर विश्वास ठेवायचा आहे. DADT द्वारे, कोणत्या गोष्टींबद्दल बोलले जाईल आणि कोणत्या गोष्टी नाहीत हे ठरवले जाते. त्यामुळे नाते घट्ट करणे सोपे जाते. एकमेकांशी जास्त भांडण न करता आपण आनंदी राहू शकतो.

### त्याचे नाव DADT का ठेवले गेले?

कराराचा भाग म्हणून, जोडपे एकमेकांच्या वैयक्तिक आयुष्यातील काही भागांबद्दल न बोलण्याचा निर्णय घेतात. विशेषतः जेव्हा त्यात दुसऱ्याचा समावेश असतो. याचा अर्थ, ते एकमेकांना विचारणार नाहीत की ते कोणाबरोबर वेळ घालवत आहेत. अशा प्रकारची तडजोड होते जिथे दोघांना प्रामाणिक राहायचे असते. त्यांना वैयक्तिक जागा देखील आवश्यक आहे. तडजोड करून एकमेकांच्या गोपनीयतेचा ते आदर करतात आणि मुक्त नातेसंबंध राखतात.

### जोडप्यांना DADT का आवडते?

कोण कोणाला आणि कधी भेटत आहे याबद्दल बोलू नये म्हणून जोडपे DADT चे अनुसरण करत आहेत. जेणेकरून यावरून त्यांच्यात भांडण होऊ नये. नात्यात शांतता असावी अशी त्यांची इच्छा आहे. त्यामुळे ते एकमेकांवर कोणताही दबाव आणत नाहीत. तरच ते एकमेकांशी मोकळेपणाने बोलू शकतील. तथापि, प्रत्येकाला ही पद्धत आवडत नाही. हा ट्रेंड फॉलो करण्यासाठी पार्टनरची विचारसरणी अशीच असायला हवी.

### पारदर्शकतेपेक्षा गोपनीयता महत्त्वाची

अशी काही जोडपी असतात ज्यांना नात्यात सर्वकाही पूर्णपणे स्पष्ट ठेवायचे नसते. या प्रकारच्या नातेसंबंधात, दोन्ही जोडीदार एकमेकांच्या वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करत नाहीत. काहीही विचारले नाही आणि सांगितले नाही, म्हणूनच त्याला DADT म्हणतात, म्हणजे विचारू नका, सांगू नका अशा जोडप्यांना वाटते की ते एकमेकांचे स्वातंत्र्य आणि त्यांचे नाते देखील वाचवू शकतात. असे केल्याने ते पारदर्शकतेपेक्षा गोपनीयतेला आणि नातेसंबंधातील आनंदाला अधिक महत्त्व देतात.



## विवाहित पुरुष अविवाहितांपेक्षा जास्त का जगतात?



**लग्नाबद्दल प्रत्येकाचे स्वत :चे विचार असतात. बदलत्या काळात लोक एकटे राहणे पसंत करू लागले आहेत. तरुणांना कोणतीही जबाबदारी न घेता स्वातंत्र्याने जगणे आवडते. जे लोक कोणाची बंधने सहन करू शकत नाहीत ते लग्नापासून लांब राहतात. एका सर्वेक्षणात भारतातील 42 टक्के तरुणांना लग्न करण्याची इच्छा नसल्याचे समोर आले आहे. आता लग्नाला वयाची जोड दिली तर कदाचित तरुणांची विचारसरणी बदलू शकेल. वास्तविक, अलीकडेच विवाहित पुरुष आणि अविवाहित मुलांचे वय यावर एक अभ्यास करण्यात आला आहे. प्रत्येकाला या संशोधनाची माहिती असली पाहिजे, जेणेकरून ते लग्न करून अविवाहित राहण्याच्या निर्णयाबद्दल योग्य विचार करू शकतील. जेणेकरून वेळ संपल्यानंतर, पश्चाताप होऊ नये...**

### अभ्यास काय सांगतो?

अभ्यासानुसार विवाहित पुरुषांचे आयुष्य अविवाहित मुलांपेक्षा जास्त असते. विवाहित पुरुषांमध्ये अविवाहितांच्या तुलनेत मृत्यूचे प्रमाण १५ टक्के कमी असल्याचे अहवालात म्हटले आहे. घटस्फोटित आणि अविवाहित मुलांचे आयुर्मान कमी असते. यासाठी आशिया खंडातील ५० ते ६० वर्षे वयोगटातील ६ लाख २३ हजार लोकांच्या आरोग्यावर अभ्यास करण्यात आला आहे. संशोधकांनी १५ वर्षांच्या कालावधीत हे संशोधन पूर्ण केले. ज्यामध्ये असे समोर आले आहे की विवाहित जोडप्यांना अपघात, दुखापत किंवा हृदयविकारामुळे मृत्यूची शक्यता २० टक्के कमी असते.

### दीर्घायुष्याचे कारण काय?

विवाहित लोक त्यांच्या आयुष्यात कमी धोका पत्करतात. त्यामुळे दारू, ड्रग्ज किंवा अपघातामुळे त्यांचा मृत्यू होण्याचा धोका कमी होतो. याशिवाय विवाहावरही सकारात्मक परिणाम होतो. त्यांना जोडीदाराकडून प्रेरणा मिळते. अविवाहित मुलांवर आर्थिक भार असतो आणि ते आर्थिकदृष्ट्या स्थिर नसतात. त्यामुळे स्वतःची आणि आरोग्याची विशेष काळजी घेत नाहीत. पत्नी किंवा मुले नसल्यामुळे त्याला जीवनात पुढे जाण्याची आणि कुटुंबासाठी जिवंत राहण्याची प्रेरणा मिळत नाही. बेफिकीरपणे जगणारी मुलं त्यांच्या आयुष्याबाबतही गंभीर नसतात. परिणामी त्यांच्या वयावरही याचा परिणाम होतो. आता कदाचित वय आणि लग्नाचा संबंध जाणून घेऊन तुम्ही योग्य निर्णय घेऊ शकाल.

## शॉर्ट न्यूज

### नववर्षाचे भक्ती उपासनाने स्वागत

**अहिल्यानगर :** १ जानेवारी २०२५ रोजी नुतन वर्षानिमीत्त चर्चमध्ये विशेष भक्तीचे नियोजन केले गेले. नुतन वर्ष तसेच प्रभु येशूचे नामकरण दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. या नविन वर्षामध्ये संकल्प करतांना त्या सर्वसमर्थ परमेश्वराला समोर ठेवून बायबलमधील शिकवणीनुसार आपले आचरण शुध्द आणि पवित्र असायला हवे जेणेकरुन या भुतलावर प्रभु येशूचे दुसरे आगमन होईल त्या दिवशी आपण त्याच्यासमोर उभे राहण्यास लायक ठरु अन्यथा नरकाच्या भयंकर यातनांपासून आपली सुटका नाही असे रेव्हरंट तुपसुंदरे पाळकसाहेब आपल्या प्रवचानातून म्हटले.

### ढगाळ हवामानामुळे पिकांवर संकट

**कोपरगाव :** तालुक्यातील पोहेगाव परिसरात गेल्या तीन-चार दिवसांपासून ढगाळ हवामान असल्याने शेतकऱ्यांच्या पिकावर मावा रोगाचा प्रादुर्भाव होत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. बदलत्या हवामानामुळे अडचणीत वाढ झाली असून या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कीटकनाशकांची फवारणी करण्यासाठी त्याला आर्थिक टंचाईचा सामना करावा लागतो आहे. परिसरातील पोहेगाव चादेकसारे सोनेवाडी आदी भागात शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये गहू, हरभरा व कांदा पिकांची लागवड केली आहे.

### भरदिवसा मारहाण करून रस्ता लूट

**नेवासा :** नववर्षाच्या पूर्वसंध्येला नेवासा तालुक्यातील पाचेगाव फाटा ते लोखंडीफॉल दरम्यान भर दिवसा रस्तालुटीच्या दोन घटना घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. एक घटना नेवासा पोलीस ठाणे हद्दीत तर दुसरी श्रीरामपूर हद्दीत घडली. एका मोटारसायकलवरुन आलेल्या ३ अज्ञात व्यक्तींनी नेवाशाकडे जात असलेले अंकुश दिलीप पवार, रा. उंबरे यांची मोटारसायकल थांबवली व मारहाण करुन १४ हजार ३०० रुपये चोरून नेले. पाचेगाव येथील अंकुश दत्तात्रय कर्डिले हा तरुण घरी येत असताना ३ अज्ञात व्यक्तींनी अडवून १९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद आरोपी मोकाट

**राहुरी :** आठ दिवसापूर्वी राहुरी शहरातील शिवाजी चौक परिसरातील राजेश गारमेंट या दुकानात भरदिवसा चोरीची घटना घडली होती. सदर चोरी करणारा भामटा सीसीटिव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे दिसत आहे. मात्र, आरोपी भामट्याचा अद्याप तपास लागला नाही. या घटनेबाबत राहुरी शहर व्यापारी असोशिएशनच्या वतीने पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. शहरातील शिवाजी चौक परिसरातील सुधीर हरजीतराव नागपाल यांच्या राजेश गारमेंट या दुकानाच्या ओट्यावर सकाळच्यादरम्यान सुमारे ७५ हजार रुपये किमतीचे रेडीमेड कपड्यांचा बॉक्स ठेवला होता.

### शेतकऱ्यांना चार वर्षांनंतर मिळणार भरपाई

**शेवगाव :** तालुक्यात सुमारे चार वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सन २०२१ च्या पावसाळ्यात नद्यांना पूर आल्याने तालुक्यातील १३ गावांतील बाधित शेतकऱ्यांना अन्न, धान्य व संसारोपयोगी साहित्याची नुकसान भरपाई येत्या दोन दिवसांत वितरीत करण्यात येईल, अशी माहिती तहसीलदार प्रशांत सांगडे यांनी दिली. १३ गावचे शेतकरी तसेच कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंगळवारी तहसील कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत तहसीलदार सांगडे बोलत होते.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला एसटी प्रवास

## ७५ वर्षांनंतर गावात धावली एसटीची बस

**गडचिरोली : प्रतिनिधी**



**गडचिरोलीमध्ये पोलिस अतिशय चांगले काम करत आहेत, या भागातला माओवाद्यांचा प्रभाव आपण संपवला आहे. माओवाद्यांचा प्रभाव संपवून आम्ही गडचिरोली हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा बनविण्यास सुरुवात केली आहे. आता ७५ वर्षांनंतर इथल्या लोकांना एसटी बस पाहायला मिळणार आहे, त्यामुळे आजचा दिवस खूप खास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.**

गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग व ताडगुडा पुलाचे लोकार्पण तसेच वांगेतुरी-गर्देवाडा-गट्टा-अहेरी बससेवेचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

गडचिरोली जिल्ह्यातील या मार्गावर जवळपास १५ गावांना पहिल्यांदाच बस सेवा मिळाली आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या बस सेवेचे उद्घाटन झाल्यानंतर त्यांनी स्वतः एसटीमध्ये बसून गावकऱ्यांसोबत प्रवास केला. माओवाद्यांच्या बालेकिल्ल्यातच मुख्यमंत्र्यांनी एसटीचा प्रवास केल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. गावकऱ्यांनी देखील मुख्यमंत्र्यांचे आभार मानून आनंद व्यक्त केला.

भारतीय स्वातंत्र्याच्या साडेसात दशकांनंतर पहिल्यांदाच या भागामध्ये बस सेवा सुरू झाली आहे. या माध्यमातून नक्षलवाद संपवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे यावेळी फडणवीस यांनी सांगितले. गडचिरोली हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नाही तर महाराष्ट्राचा पहिला जिल्हा करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. या भागात चांगले रस्ते आणि पुल विकसित केले गेले, असल्याचा दावा त्यांनी केला. नक्षलवाद्यांना आता स्थानिकांचे सहकार्य मिळत नसल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. एकच नाही तर अनेक नक्षलवादी आता आत्मसर्पण करत असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

**मोठ्या प्रमाणात शरणागती**

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''गडचिरोलीच्या या भागात एक रस्ताही नव्हता आणि इथे माओवाद्यांचे पूर्ण वर्चस्व होते. आज ते वर्चस्व आम्ही संपवत आहोत. येथे २ मोठ्या चौक्या बांधल्या आहेत. छत्तीसगडला थेट जोडणारा रस्ता आणि पूल बांधला तर ७५ वर्षांनंतर इथल्या लोकांना राज्य परिवहन बस बघायला मिळेल हा एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे, आम्ही म्हणालो होतो की गडचिरोली हा महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नाही, तो महाराष्ट्रातील पहिला जिल्हा असेल आणि आम्ही ते सुरू केले आहे... आता इथे माओवाद्यांना नवीन लोक भेटत नाहीत. माओवाद्याची भरती बंद असून मोठ्या प्रमाणात शरणागती पत्करत आहेत, त्यामुळे ती संपुष्टात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

# सर्वसामान्य भाविकालाही मिळणार साईबाबांच्या आरतीचा मान

## पंढरपूरच्या धर्तीवर शिर्डीतही निर्णय लागू

**शिर्डी : प्रतिनिधी**



**नवीन वर्षात शिर्डी येथील साईबाबा संस्थेने भक्तांना मोठी भेट दिली आहे. रांगेत उभे राहून दर्शन घेणाऱ्या सामान्य भक्त जोडीला आजपासून साईबाबांच्या आरतीला अग्रभागी उभे राहण्याचा मान देण्यात येणार आहे. पंढरपूरनंतर आता शिर्डीमध्ये देखील या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच रोज होणाऱ्या आरतीला एका भाग्यशाली जोडीला आरती करण्याचा मान दिला जाणार आहे.**

साईबाबांची माध्यान्ह, धूप आणि शेज आरतीला भाग्यशाली जोडी सर्वात पुढे उभी असणार आहे. आरती सुरू होण्यापुर्वी सामान्य दर्शनरांग थांबवली जाते. यावेळी जी जोडी सर्वात पुढे असेल त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. आज झाशी येथून आलेले मनीष रजक दाम्पत्य हे भाग्यशाली ठरले. त्यांना आरतीला अग्रभागी उभे करण्यात आले. जवळपास चार तास हे दाम्पत्य दर्शनाच्या रांगेत उभे होते. आरतीच्या वेळी हे दाम्पत्य समोर पोहोचले आणि थेट त्यांना आरती करण्याची संधी मिळाली, यामुळे हे दाम्पत्य भारावून गेले.

दरम्यान, या पूर्वी सशुल्क पास धारक, दानशूर भाविक तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींनाच ही संधी देण्यात येत होती. मात्र आता नवीन वर्षापासून सर्वसामान्य भक्तांना आरतीचा मान दिला जाणार आहे. यामुळे भक्तांमध्ये देखील उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी साईबाबांच्या चरणी १३ लाख ३० हजार रूपयांचे सुवर्ण हार अर्पण करण्यात आले आहे. साईभक्त बबिता टीकू आणि परिवाराकडून साईचरणी हे सुवर्ण दान अर्पण करण्यात आले आहे. साई मूर्तीला आज हा आकर्षक नक्षीकाम केलेला सुवर्ण हार परिधान करण्यात आला.

दरम्यान, आता त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शन सेवा बंद ५ जानेवारीपर्यंत बंद करण्यात आली आहे. नाताळातील सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. राज शिष्टाचारासंबंधित अतिमहत्त्वाचे व्यक्ती वगळता इतरांना व्हीआयपी दर्शन बंद राहणार आहे.

# शाळेत रेडा घुसला ! १३ विद्यार्थी जखमी

## एकाचा पाय मोडला, घाटीत उपचार सुरू



**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर शहरातील एका शाळेत रेडा घुसल्याची घटना समोर आली आहे. रेड्याने केलेल्या हल्ल्यात शाळेतील १३ मुले जखमी झाली होती. बुधवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. जखमी मुलांना उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हा रेडा कुठून आणि कसा आला, याबाबत माहिती समजू शकली नाही.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर शहरातील टाऊन हॉल येथे मॉडेल इंग्रजी शाळेत बुधवारी नेहमीप्रमाणे वर्ग सुरू होते. परंतु, सकाळी साडे दहाच्या सुमारास एक रेडा अचानक शाळेत घुसला. या रेड्याने शाळेत धुडगूस घालायला सुरुवात केल्यानंतर एकच धावपळ झाली. रेड्याच्या हल्ल्यात १३ मुले जखमी झाली. जखमी विद्यार्थ्यांवर घाटी रुग्णालयात उपचार करण्यात आले. आतापर्यंत ११ विद्यार्थ्यांनी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर एका विद्यार्थ्याची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. रेड्याच्या हल्ल्यात एका विद्यार्थ्याचा पाय मोडला आहे.

दरम्यान, या घटनेवरून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काही दिवसांपूर्वीच छत्रपती संभाजीनगरमध्ये एका स्कुलबसला आग लागली होती. या बसमध्ये चौथी ते सातवी वर्गात शिकणारे ३५ विद्यार्थी होते. दोन शिक्षकांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला होता. सिल्लोड तालुक्यातील आमठाणा येथे ही घटना घडली होती. शाळेकडे जात असताना धावत्या बसमधून अचानक धूर निघू लागला. ही बाब चालकाच्या लक्षात येताच त्यांनी वाहन थांबवले. यावेळी बसमध्ये बसलेल्या दोन शिक्षकांनी तातडीने विद्यार्थ्यांना बसमधून खाली उतरवले. सर्व मुले बसमधून खाली उतरवल्यावर काही क्षणात बसने पेट घेतला.

## वाचकांच्या लेखणीतून

# स्वधर्माचा अवमान होणे नको



ऑल इंडिया मुस्लिम जमात मौलाना या संघटनेचे अध्यक्ष शहाबुद्दीन रझवी यांनी ख्रिस्ती नववर्ष २०२५ संदर्भात नववर्ष साजरे करणे, नववर्ष शुभेच्छा देणे, पार्टी आयोजित करणे हे सर्व इस्लामविरोधी असून मुस्लिमांनी या जल्लोषापासून लांब राहावे असा फतवा काढला आहे म्हणे. त्यात फारसे काही वावगे नाही, असे म्हणावे लागेल.

आपण हिंदूंनीसुध्दा यातून बोध घेतला पाहिजे. आपले नवे वर्ष गुढी पाडव्यापासून सुरू होते. ते आपल्या धर्माज्ञेनुसार आपण जरूर पाळावे. पण या ख्रिस्ती नववर्षाचा जल्लोष साजरा करू नये. पार्ट्या करू नयेत. ख्रिसमस सणानिमित्त ख्रिस्ती बांधवांना शुभेच्छा देण्यास हरकत नसावी. पण आपल्या धर्माचे पालन करणे आपण विसरू नये. दारू पार्ट्या करणे, जल्लोष करणे सर्वथैव टाळावे. आपण आपल्या धर्माची साधनशुचिता पाळावी. समस्त हिंदू धर्मियांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील हिंदू पिढ्या ख्रिसमस हा आपलाच सण समजू लागतील असे भयंकर भाकित वाटते. परधर्माचा सन्मान करतानाच स्वधर्माचा अवमान होणार नाही हे आपण आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. धार्यते इति धर्मः (ज्याच्यामुळे धारण होते तो धर्म) किंवा ज्याच्यामुळे मनुष्याची लौकिक आणि आध्यात्मिक उन्नती होते तो धर्म. अशी आपली धर्माची व्याख्या आहे. म्हणून हे विचार आपल्यापुढे प्रस्तुत केले आहेत.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून

### वीजदरवाढीची टांगती तलवार!

औष्णिक वीज उपलब्ध करते व त्या प्रकल्पांमध्ये हे युनिट बसविलेले नाही. तर अदानी, रतन इंडिया अशा काही खासगी वीज कंपन्यांनी मात्र हे युनिट बसविण्यास सुरुवात केली आहे. हे युनिट बसविल्याने खर्च वाढत असल्याने वीजनिर्मिती व वितरण कंपन्यांचा त्यास विरोध आहे. त्यामुळे हे युनिट बसविण्यासाठीची मुदत पर्यावरण खात्याने काहीवेळा वाढवून दिली. यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी पर्यावरण खात्याने राष्ट्रीय विज्ञान संस्थेला विनंती केली होती. त्यानुसार वेगळी वैज्ञानिक पद्धत सुचविण्यात आली आहे.

नवी दिल्लीत १० जानेवारीला बैठक

राज्यातील औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये बहुतांश देशी कोळसाच वापरला जातो व आयात कोळसा वापरण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. देशी कोळशामध्ये सल्फरची मात्रा तुलनेने खूप कमी असते. त्यामुळे आता डीसल्फरायझेशनची सक्ती करावी की अन्य पद्धतीचा वापर करावा, यासंदर्भात केंद्रीय पर्यावरण, ऊर्जा विभाग, राष्ट्रीय विज्ञान संस्थेतील तज्ज्ञ आदी संबंधितांची बैठक १० जानेवारी रोजी नवी दिल्लीत होणार आहे, असे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले.

तरच दरवाढीचा बोजा येणार नाही

'डीसल्फरायझेशन' (एफजीडी) युनिट बसविण्याची सक्ती केल्यास वीजदरात प्रतियुनिट ३५-४० पैसे वाढ होण्याची भीती आहे. या पद्धतीची गरज नसल्याचा राष्ट्रीय विज्ञान संस्थेच्या तज्ज्ञांचा अहवाल असून राज्य सरकारने केंद्राकडे पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तरच राज्यातील औष्णिक वीजनिर्मिती कंपन्यांची या सक्तीतून सुटका होऊ शकेल व ग्राहकांवर वीजदरवाढीचा बोजा येणार नाही.

अशोक पेंडसे, वीजतज्ज्ञ

### देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी अजित पवारांच्या ताफ्यात?

हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यात ही घटना घडली. यानंतर या हत्याप्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर हत्येचा मास्टरमाईंड असल्याचा संशय ज्याच्यावर आहे तो वाल्मिक कराडही ३१ डिसेंबरला पोलिसांना शरण आला. आता या वाल्मिक कराडबाबत नवे आरोप होताना दिसत आहेत. बजरंग सोनवणेंनी थेट नाव घेतलं नसलं तरीही त्यांचा रोख हा वाल्मिक कराडकडेच आहे.

**धनंजय मुंडे काय म्हणाले?**

वाल्मिककराडहा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय आहे. तसंच या प्रकरणाची माहिती त्यांना होती असा आरोप होतो आहे. दरम्यानधनंजय मुंडेयांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधक करत आहेत. यासंदर्भात मुंडे यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, ''मी राजीनामा द्यावा तर का द्यावा? याचं काहीतरी कारण तर लागेल. या कुठल्याही प्रकरणामध्ये मी ना आरोपी आहे, ना माझा कुठलाही संबंध आहे. मात्र, उगचीच कोणाचातरी राजीनामा मागायचा?'', असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं.

### पार्थिव घरी आणताना मृत बाबा चक्क उठून बसले!

त्यानंतर घरच्यांनी नातेवाईकांना निधनाची माहिती दिली यानंतर त्यांच्या घरी अंत्यसंस्काराची तयारीही सुरू झाली होती. दरम्यान हॉस्पिटल मधून ॲम्बुलन्स घरी येताना वाटेत मोठ्या खड्ड्यात ॲम्बुलन्स चाक गेलं आणि याचा धक्का बसल्यानं पांडुरंग उलपे यांच्या शरीरात हालचाल झाली. हे नातेवाईकांच्या लक्षात आलं, त्यांनी तात्काळ ॲम्बुलन्स कसबा बावड्यातील डी वाय पाटील हॉस्पिटल कडे वळवली. मात्र डॉक्टरांनी उपचार करण्याआधी खात्री दिली नाही, डॉक्टरांनी केलेले अथक प्रयत्न आणि पांडुरंग उलपे यांच्या इच्छाशक्तीच्या बळावर त्यांनी मृत्यूवरही विजय मिळवला.

दोन दिवसात हळूहळू पांडुरंग उलपे यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. बुधवारी सकाळी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांचं वारकरी संप्रदायातील सहकाऱ्यांनी स्वागत केलं, त्यांचं औक्षण करून त्यांना दीर्घ आयुष्य मिळावं अशी प्रार्थना पांडुरंग चरणी करण्यात आली, फुलांच्या पायघड्या घालून वारकरी पांडुरंग उलपे यांचं स्वागत झालं तर पांडुरंग उलपे यांना पुनर्जन्म मिळाल्याची मात्र जिल्हाभर सुरू आहे.

# किसान संकुल नव्या भरारीच्या तयारीत!

## ■ आ. काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन
## ■ किसान शैक्षणिक संकुलात वार्षिक स्नेहसंमेलन




**पारनेर : प्रतिनिधी**

**काळाची पावले ओळखून चंद्रकांत चेडे यांनी पारनेर शहरात सीबीएसई अभ्यासक्रम सुरू केला. ज्युनिअर, सिनिअर कॉलेजबरोबरच विधी महाविद्यालयही सुरू करण्यात आले. आता किसान संकुल नवी भरारी घेण्याच्या तयारीत असून त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी त्यांना हवी ती मदत देईल अशी ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.**

### चंद्रकांत चेडे यांची दुरदृष्टी

शिक्षण क्षेत्रात सतत बदल होत आहेत. ही दुरदृष्टी ठेऊन चंद्रकांत चेडे यांनी दहा वर्षापूव सीबीएससी माध्यमाचे स्कुल सुरू केले. एमबीबीएस चे शिक्षण घेणारे विद्याथ या शाळेत शिकून गेले आहेत. यावरून या संस्थेचा दर्जा अधोरेखित होतो.

**संजय वाघमारे**
ज्येष्ठ पत्रकार

किसान इंटरनॅशनल स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या वार्षिक स्नेसंमेलनात आ. दाते हे बोलत होते. यावेळी किसान परिवाराचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, मा. नगराध्यक्ष विजय औटी, ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे, नगरसेवक अशोक चेडे, डॉ. विद्या कावरे नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, मा. नगरसेवक संदीप देशमुख, कुणाल पोटे, प्राचार्य मनोज राठोर, सुमन दाते, सोनाबाई चौधरी, आशा चेडे, ऋषीकेश चेडे, विनोद गोळे, सनी सोनावळे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, ४८ वर्षापूर्वी पारनेर शहरात आलो. पारनेरकरांनी फार प्रेम दिले. छोटया व्यवसायातून मोठया व्यवसायात यश मिळाले. पुढे समाजकारण, राजकारणात काम केले. आज सुदैवाने तुमच्या आशिर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. त्यात तुम्हा सर्वांचा सहभाग असल्याचे दाते यांनी कृतज्ञतापुर्वक नमुद केले.

जागतिक स्पर्धेत विद्यार्थी घडले पाहिजेत. जग जवळ आले आहे, संगणक, आय टी क्षेत्रात प्रगती मोठी झाली आहे. आज देशातील अनेक गुणवंत तरूण जगात अनेक ठिकाणी काम करतात. जागतिक पातळीवर आपले ज्ञान वाढवायचे असेल तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेची गरज ओळखून चंद्रकांत चेडे यांनी हे रोपटे लावले त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

### चेडे परिवाराचे स्वप्न पुर्ण झाले

सन २००४ पासून वाटत होते की दाते सर आमदार व्हावेत, त्यांच्याकडे तालुक्याचे नेतृत्व करण्याचे गुण आहेत. आज ते आमदार झाले असून चेडे परिवाराचे स्वप्न पुर्ण झाले आहे.

**चंद्रकांत चेडे**
अध्यक्ष, किसान परिवार

### किसानने वैभव उभे केले

पारनेर परिसरात किसान संस्थेने वैभव उभे केले. गेल्या दहा वर्षापूव त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. या रोपटयाचा आता वटवृक्ष झाला आहे. या संस्थेच्या उभारणीत आपलाही सहभाग आहे. प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक तज्ञ आहेत. या संस्थेला जिथे गरज पडेल तिथे मदत करण्यासाठी मी सदैव तयार आहे.

**प्रशांत गायकवाड**
संचालक, जिल्हा बँक

### डॉ. तेजस यांचा आदर्श घ्या

या शाळेने मोठया संख्येने विद्याथ घडविले. डॉ. तेजस औटी हा विद्याथ एमबीबीएस करून ते पुढील शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक वारसा असल्याने त्याने हे यश मिळविले. पदव्युत्तर शिक्षणात त्यांचे रॅंकींग ऑल इंडिया लेव्हला आले हे या संस्थेचे यश आहे. तेजस यांची प्रगती पाहून विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा. प्रत्येकाने प्राविण्य मिळविण्याचा ध्यास घेतला तर या संकुलाचा नावलौकीक वाढल्याशिवाय राहणार नाही.

**आमदार काशिनाथ दाते**
विधानसभा सदस्य

### माझा कार्यक्रम करू नका !

दाते सर दुर्गम भागातून पारनेरला आले, टायपिंग इन्टिट्युट सुरू केले. पुढे अनेक पदांवर काम करून आज ते आमदार आहेत. चंद्रकांत चेडे यांनी सुरूवातीस छोटे दुकान, हॉटेल, शिक्षण संस्था सुरु करून राजकारणातही ते स्थिरावले आहेत. चेडे यांची चाल दाते सरांसारखीच आहे. दाते सरांनी माझा कार्यक्रम केला आहे, चंद्रकांत चेडे यांनी आता पुन्हा माझा कार्यक्रम करू नये असे सांगत मा. नगराध्यक्ष विजय औटी यांनी मिष्किली केली.

# विकास कामांमध्ये कमी पडणार नाही

## खासदार नीलेश लंके यांची ग्वाही

**कोहकडी : प्रतिनिधी**

**पाच वर्षे आमदार असताना आपण पारनेर-नगर मतदारसंघात सुमारे १ हजार ८०० कोटी रूपयांची विकास कामे मार्गी लावली. यापुढील काळातही आपण विकास कामांमध्ये कमी पडणार नाही अशी ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली.**


■ कोहकडी येथील बंधाऱ्यांचे खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले.

कोहकडी येथील १ कोटी २४ लाख ७३ हजार रूपये खर्चाच्या खंडेकर मळा येथील कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे खा. लंके यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले, त्यावेळी खा. लंके हे बोलत होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, कोहकडी हा परिसर बागायत भाग आहे. या भागाला कुकडी कालव्याचे नियमित पाणी मिळावे यासाठी आपण यापूर्वही पुढाकार घेतला. यापुढील काळातही या भागाला पाणी कमी पडणार नाही. जेथे शक्य असेल तिथे पाणी आडविण्यास आपण प्राधान्य देणार आहोत. कोहकडी येथील टोणगेवाडी येथेही बंधारा मंजुर करण्यात आला असून त्याचे कामही लवकरच सुरू करण्यात येईल अशी ग्वाही लंके यांनी दिली.

यावेळी सुदाम पवार, खंडू भुकन, अर्जुन भालेकर, गंगाराम बेलकर, प्रा. संजय लाकुडझोडे, कारभारी पोटघन, सरपंच सिमा पवार, वसंत कवाद, ठकाराम लंके, अमृताशेठ रसाळ, किसनराव रासकर, रूपेश ढवण, डॉ. आबासाहेब खोडदे, जालिंदर झरेकर, राजेश शेळके, जालिंदर तानवडे, नितिन चिकणे, भाउसाहेब आढाव, प्रदीप सोमवंशी, कांतीलाल शेळके, अण्णा बढे, विलास मदगे, संभाजी मदगे, बापू मदगे, प्रविण उदमले, बाजीराव कारखिले, कैलास डोमे, दत्ता शेंडगे, लहानू टोणगे, रामदास चौधरी, मल्हारी धरणे, सर्जेराव चौधरी, गोरख टोणगे, वाल्मीक टोणगे, जयवंत गायकवाड, विशाल गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

### पवार आमचे आधारस्तंभ

माजी सभापती सुदाम पवार हे आपले आधारस्तंभ आहे. प्रतिष्ठाणच्या माध्यमातून अनेक सामाजिक कामे माग लावण्यात त्यांचे योगदान आहे. त्यांच्या वाढदिवसानिमत्त दरवर्षी विकास कामांचे भुमिपुजन करण्यात येते. यंदाही विकास कामांचे भुमिपुजन करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

**खासदार नीलेश लंके,**
लोकसभा सदस्य

# कृषी सोलर देताना पैशांची मागणी!

## शिवबाचे अध्यक्ष अनिल शेटे यांचा गंभीर आरोप

**निघोज : प्रतिनिधी**



**मागील सरकारच्या काळात कृषी सोलर योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याने काही शेतक-यांना विहीरीसाठी सोलर मिळाले. मात्र ही योजना राबविताना काही अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांकडून अतिरिक्त पैशांची मागणी करत असून वरीष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधितांना तंबी देउन ही योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी केली.**

निघोज, गाडीलगांव, गुणोरे, म्हसे, कोहकडी हा नदीकाठी असणारा भाग असून या परिसरात उसाचे व इतर पिकांचे उत्पादन घेण्यात येते. या भागात बिबटयांचे प्रमाण मोठया प्रमाणावर असून त्यांच्याकडून पाळीव प्राण्यांवर हल्ले होत आहेत. शेतामध्ये सध्या कामाचे दिवस असून शेतीला पाणी देण्यासाठी एक आठवडा दिवसा तर एक आठवडा रात्रीचा वीज पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे शेतकरी बांधवांना रात्रीच्या वेळी पीकांना पाणी देण्यासाठी जावे लागते. बिबटयांच्या भितीने जीव मुठीत धरून शेतकरी शेतामध्ये जातात. त्यासाठी कृषी सोलर ही योजना शेतकरी बांधवांसाठी वरदान आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी ही योजना राबविताना शेतकऱ्यांना सहकार्य करणे गरजेचे आहे. शेतकरी बांधवांची अडवणूक झाल्यास शिवबा संघटना आंदोलनाची भुमिका घेईल असा इशारा शेटे यांनी दिला आहे.

आमदार नीलेश लंके, जिल्हाधिकारी यांना या निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

निवेदनावर अनिल शेटे, राजू लाळगे, शंकर वरखडे, नागेश नरसाळे, यश राहणे, ज्ञानेश्वर खाडे, नीलेश दरेकर, विकास मोरे, शांताराम पाडळे, दत्ता टोणगे, मोहन पवार, गणेश साळुंके, वैभव गाडीलकर, उत्कर्ष जगदाळे, संतोष येवले, संदीप येवले, शैलेश ढवळे, स्वप्निल लामखडे, खंडू लामखडे, अंकुश वरखडे, तेजस टेकाडे, सुयोग टेकाडे, ठकाराम खोडदे, जयराम सरडे, नौशाद पठाण, गुलाबराव नवले, विकास मोरे, अक्षय बेलोटे, अमोल गेरे, किसन चौधरी, संतोष साबळे, संतोष येवले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा जपण्याची जबाबदारी तरूणांची

## प्रा. प्रशांत खामकर यांचे प्रतिपादन

**अळकुटी : प्रतिनिधी**



**भारतास देव देवता, ऋषीमुनी, संत महंत, राजे-महाराजे, प्रबोधकीय व्यक्ति, विचारवंत अशा महापुरूषांचा ऐतिहासिक व सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. या वारशाचे संवर्धन करण्याची जबाबदारी तरूणांवर असल्याचे प्रतिपादन प्रा. प्रशांत खामकर यांनी केले.**

अळकुटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये प्रा. खामकर यांनी महापुरूषांचे विचार ही आजच्या काळाची गरज या विषयावर आपले विचार मांडले. महापुरूषांचे विचार आपला समाज घडविण्याचे काम करतात.

दुसऱ्या दिवशीचे विचारपुष्प प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी समाज ताकर संत साहित्य या विषयावर पुष्प गुंफले. ते म्हणाले, संत विचार आपणास क्षणोक्षणी उपकारक ठरतात. प्रा. संभाजी दरवडे हे अध्यक्षस्थ स्थानी होते.

प्रा. बाबासाहेब खराडे यांनी हसण्यासाठी जन्म आपुला या विषयावर तिसरे विचार पुष्प गुंफताना आयुष्याचा मनमुराद आनंद घ्या, नेहमी हसत रहा व नातेसबंध वृध्दींगत करा असा सल्ला दिला.

यावेळी प्राचार्य डॉ. कुंदा कवडे, प्रा. विशाल कवडे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. अमोल नालकर, प्रा. तांबे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. सचिन बसलाने , प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. ऋषीकेश , प्रा. पुजा वैरागर, प्रा. पांडूरंग उघडे, डॉ. शांता थोरात, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, सुनिता भालेराव, नितीन घोलप, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंग्ध्वज, मच्छिंद्र म्हस्कुले, वैजनाथ आवारी, रविंद्र वाघ, पांडूरंग शिरोळे, शिवाजी कळंबे आदी उपस्थित होते. प्रा. सुषमा करकंडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# दैठणे गुंजाळला विशेष उपासना संपन्न

## नववर्षाचे औचित्य ; ख्रिस्ती बांधवांची उपस्थिती

**दैठणे गुंजाळ : प्रतिनिधी**



**पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ येथील ह्युम मेमोरियल चर्च मध्ये नववर्षानिमित्त विशेष उपासना संपन्न झाली.यावेळी मंडळींच्या सभासदांसह ख्रिस्ती बांधव उपस्थित होते.**

अध्यक्षस्थानी प्रमुख धर्मगुरू रेव्हरंड सुनिल भांबळ होते.सि .स्मिता शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.नाताळनिमित्त संडे स्कुलच्या मुलांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय व वकृत्व स्पर्धेत केंद्रात व तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला याबद्दल स्वराली आंग्रे हिचा रोख रक्कम व भेटवस्तु देवुन रेव्हरंड सुनिल भांबळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.उपस्थितांना मिठाईचे वाटप करण्यात आले.अमोल केदारी,सचिन आंग्रे, संजय आंग्रे,विजय आंग्रे,अशोक आंग्रे,आकाश जाधव,सुबोध शिंदे,आनंद आंग्रे,अरविंद जाधव आदी उपस्थित होते.

# देवराम वाढवणे यांचे निधन

**देवीभोयरे : प्रतिनिधी**



गावचे जुन्या पिढीतील एक कष्टकरी आदर्श व्यक्तीमत्व देवराम बाबू वाढवणे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब वाढवणे, शंकर वाढवणे, जगदंबा सहकारी पतसंस्थेचे मुख्य व्यवस्थापक रावसाहेब वाढवणे यांचे ते वडील होत. तर देवीभोयरे गावच्या माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्या सुलोचना रावसाहेब वाढवणे यांचे ते सासरे होत.

# माहेर संस्थेकडून सख्यांच्या पंखांना बळ!

**सुपा : प्रतिनिधी**

**सख्यांच्या पंखांना बळ देण्याचे मोलाचे काम माहेर संस्थेकडून करण्यात येत असल्याचे गौरवोद्गार ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी काढले.**



■ माहेर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन नव्या उपक्रमाची माहीती दिली.

पारनेर शहरात प्रथमच सायकल आणि स्कुटी चालविण्याचे प्रशिक्षण माहेर सेवाभावी संस्थेच्या संस्थापक सुप्रिया मंडलीक यांच्या संकल्पनेतून समाजातील विविध वयोगटातील महिलांना देण्यात येत आहे. या महिलांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट देऊन उपक्रमाची माहीती दिल्यानंतर हजारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

माहेर संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत हजारे म्हणाले, या उपक्रमामुळे महिलांचा वक्तशीरपणा वाढण्यास मदत होईल. माहेर सेवा भावी संस्थेच्या संस्थापिका सुप्रिया मंडलिक आणि संस्थेच्या इतर महिला सदस्यांनी हजारे यांनी या उपक्रमाची माहीती दिली.

ग्रामीण विद्यार्थीनींना सायकल बँक, एक हात शेतकऱ्यांच्या लेकीसाठी हा उपक्रम भारतीय व्यापारी नौदल अधिकारी विश्वनाथ श्रीधर गायकवाड यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार असल्याची माहीती हजारे यांना देण्यात आली. हजारे यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

आजच्या धावपळीच्या जगामध्ये महिलांना शालेय, कार्यालयीन तसेच वैद्यकिय क्षेत्रांशी संबंधित कामांसाठी वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य असते. प्रत्येक ठिकाणी पायी जाणे शक्य नसल्याने अशा सख्यांना सायकल, स्कुटी शिकण्याची आवष्यकता भासते. त्यामुळे सायकल, स्कुटी ही काळाची गरज ओळखून सुप्रिया मंडलिक यांनी स्कुटी सायलक शिकविण्याच्या उपक्रमास पारनेर शहरात सुरूवात केली असून त्यास शहरातील महिलांकडून प्रतिसाद मिळत आहे.

# काव्याने बांधलेले घरटे सुखात असते!

## प्रसिद्ध कवी प्रा.अनंत राऊत | पारनेर पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक महोत्सव

**पारनेर : प्रतिनिधी**

**''रडतोस काय वेड्या संकट कुणास नसते, काव्याने बांधलेले घरटे सुखात असते'' संकटाने आयुष्य सुरक्षित असते, संकटांना घाबरायचे नसते अशा आशयाची कविता सादर करीत प्रसिद्ध कवी प्रा.अनंत राऊत यांनी संकटावर मात करत जगण्याचे शिका असा मौलिक सल्ला विद्यार्थ्यांना दिला.**



येथील पारनेर पब्लिक स्कूलच्या शिक्षण महोत्सवानिमित्त मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा या प्रसिद्ध कवितेचे गीतकार प्रा. राऊत यांच्या कवितेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी त्यांनी कवितेबरोबरच विविध विषयांवर उपस्थितांना उद्बोधक मार्गदर्शन केले.विद्यालयाचे प्राचार्य गीताराम म्हस्के,उद्योजक सुरेश पठारे,राळेगण सिद्धीचे सरपंच लाभेश औटी, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे,साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य दिनेश औटी, ज्येष्ठ पत्रकार मार्तंडराव बुचडे, देविदास आबूज,विनोद गोळे, सनी सोनावळे,सखाराम औटी, भास्कर गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते. कवी राऊत म्हणाले की,

**''दुःख अडवायला उंबऱ्यासारखा**
**मित्र गारव्यामध्ये वनव्यासारखा''**

मैत्री हे जगातले सर्वात मोठे नाते आहे. मित्र आणि मैत्रिणीला मैत्रीमध्ये जात,धर्म,सीमा नसते मैत्रीसाठी वयाचे बंधन देखील नसते मैत्रीमुळे अनेकांच्या जीवनात बदल घडल्याचे सांगत प्रत्येकाने आयुष्यात एक तरी जिवलग मित्र जपला पाहिजे असे देखील कवी राऊत यांनी सांगितले.

तरुणाईवर बोलताना कवी राऊत म्हणाले की सध्या मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर होत आहे. मोबाईल हे दुधारी शस्त्र आहे.मोबाईलच्या सकारात्मक वापरामुळे अनेक जण उच्चपदस्थ अधिकारी देखील झाले आहेत त्यामुळे मोबाईलचा वापर चांगल्या गोष्टींसाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करीत पारनेर पब्लिक स्कूल हे विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेले विविध उपक्रम स्तुत्य असल्याचे कवी प्रा. राऊत यांनी सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे म्हणाले की, पारनेर पब्लिक स्कूलमध्ये शिक्षणाबरोबरच जगायचे कसे असे संस्काराचे धडे शिकविले जात आहेत हे या स्कूलचे वेगळेपण आहे.येथील विद्यार्थी हे सर्वच क्षेत्रात अग्रेसर असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकडे लक्ष दिले जात असल्याचेही श्री.वाघमारे यांनी सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com